**फौ.कि.अर्ज.क्र.१३२/२०११**

**नि.क्र.८**

## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

**नाव – शरीफाबी नय्युम शेख**

**वय –** ४० वर्षे, **व्यवसाय** – घरकाम,

**राहणार –** जळकोट, ता. जळकोट, जि. लातूर.

**अभियोग पक्षातर्फे शपथेवर सरतपास श्री. के. टी. उगलमुगले सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

माझा विवाह २२ वर्षांपूर्वी आरोपीसोबत झाला आहे. विवाहानंतर मी आरोपीच्या घरी नांदण्यासाठी गेले. त्या ठिकाणी आरोपीसोबत त्याचे आईवडील राहत होते. आरोपीसोबत माझा किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे मी त्याच्याविरूद्ध तक्रार दाखल केली होती. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझ्या अंगठ्याची निशाणी आहे. त्यास **नि.क्र.०९** देण्यात येते. आरोपीने वीस हजार रूपयांची मागणी करून माझ्यावर चाकूने वार केला, असे काही घडले नाही. आरोपीने मला शारीरिक व मानसिक त्रास दिला नाही.

**(सरकारी वकिलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा कायदा कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पद्धतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.)**

२. आता मला रेखांकित भाग–अ वाचून दाखविला. त्याबाबत मला काही माहिती नाही. आरोपीसोबत माझा वाद मिटलेला आहे. या प्रकरणात मला कोणताही साक्षीदार तपासावयाचा नाही. प्रस्तुत प्रकरण बंद केल्यास माझी कोणतीही अडचण नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्ष ही फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २९९ प्रमाणे नोंदविलेली असल्यामुळे उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.07.30 17:35:04 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

उदगीर **(के. ए. यादव)**

दिनांकः ३०/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर

(न्यायालय क्र.३)